नोटीस

सिव्हील सी–१ क्र.:११७९१/२०२२
नागपूर
मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर
रिट पीटीशन क्र. ४६२७/२०२२

वादी :– डॉ. सुरेखा केशव मेंढे
–विरुध्द–
प्रतिवादी :– महाराष्ट्र राज्य–प्रधान सचिव द्वारा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई आणि ईतर
प्रति,
प्रतिवादी क्र. ३ : जी. डीसूजा,
रा. पी. ओ. बॉक्स नंबर ८४७६, मुंबई – ४०० १०३

वरील प्रतिवादी यांना सूचित करण्यात येते की, डॉ. **सुरेखा केशव मेंढे** यांनी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२६ आणि २२७ अंतर्गत वरील रिट पिटीशन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठा समोर दाखल केली आहे व ती या न्यायालयाने पंजिबध्द् करुन प्रतिवादीस नोटीस जारी केली आहे.

उपरोक्त **रिट पिटीशन क्र. ४६२७/२०२२** ची पुढील सुनावणी दिनांक **१७/१०/२०२२** रोजी होईल किंवा न्यायालयाच्या सवडीनुसार होईल.

यास्तव तुमच्यातर्फे तुम्ही स्वतः किंवा तुमच्या वकीला मार्फत किंवा तुम्ही नेमून दिलेल्या प्रतिनिधीद्वारे वरील निर्दिश्ट रिट पिटीशन च्या सुनावणी दरम्यान ह्या न्यायालयात उपस्थित न राहिल्यास तुमच्या गैर हजेरीत एकतर्फी सुनावणी करुन हे न्यायालय आपला निर्णय जारी करेल.

यांस सांक्ष **श्री. दिपांकर दत्ता**, मुख्य न्यायाधिश, मुंबई आज तारीख **०८/०९/२०२२.**

न्यायालयाच्या आदेशान्वये
सही/–
(सुनिल शं. हेटे)
सहाय्यक प्रबंधक
मुंबई उच्च न्यायालय,
नागपूर खंडपीठ, नागपूर

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, सौ. टीना राकेश अग्रवाल हे मायफेअर गार्डन्स को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., आझाद लेन, अंधेरी(पश्चिम), मुंबई ४०० ०५८ अशा ज्ञात सोसायटी मधील मायफेअर गार्डन्स अशा ज्ञात इमारतीमधील पाचव्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ५०४ मोजमापित ४०.१८ चौ.मी(४३२.४५ चौ.फु.) बिल्ट क्षेत्र आणि बाल्कनी मोजमापित अंदाजे २.५५ चौ.मी(२७.४९ चौ.फु.) क्षेत्र आणि सदर सोसायटीद्वारे जारी शेअर प्रमाणपत्र क्र. ५२ अन्वये विभिन्न क्रमांक ०२५६ ते ०२६० (दोन्ही एकत्रित) धारक प्रत्येकी रु.५०/– चे पाच (५) पूर्ण भरणा शेअर्स चे मालक श्री. सत्यम विश्वनाथन यांची पत्नी सौ. आरती सुर्यकांत मेहता यांसकडुन खरेदी करण्यास इच्छुक आहेत.

सदर फ्लॅट हा त्यांची आई मयत डॉ. प्रतिभा सुर्यकांत मेहता व वडील श्री. सुर्यकांत एम.मेहता द्वारे संयुक्तपणे धारण केला होता व मयत डॉ. प्रतिभा सुर्यकांत मेहता यांच्या निधनानंतर त्यांचे नाव शेअर प्रमाणपत्रामधून काढून टाकण्यात आले आणि श्री. सुर्यकांत एम.मेहता हे सदर फ्लॅटचे परिपूर्ण मालक झाले. श्री. सुर्यकांत एम.मेहता यांनी नैसर्गिक ममत्वामुळे त्यांची मुलगी सौ. आरती सुर्यकांत मेहता यांना अनुक्रमांक. बीडीआर४–७१४९–२०१५ अन्वये अंधेरी क्र.२ येथील हमीचे उपप्रबंधक यांसह रितसर नोंदणीकृत २४ सप्टेंबर, २०१५ रोजीचा नोंदणीकृत भेट विलेखान्वये त्यांना सदर फ्लॅट भेट केला.

कोणत्याही व्यक्ती, फर्म, संस्था, कंपनी यांना वरीलसदर मिळकतीच्या आणि कोणत्याही सरकारी दायित्व संदर्भामध्ये कोणताही हक्क, नामाधिकार, हितसंबंध, ताबा किंवा दावा असल्यास याद्वारे सदर ज्ञात लिखित कागदोपत्री पूराव्यांसह निम्नस्वाक्षरीकारांना माझे कार्यालय येथे ९६ कादरी पार्क, आझाद इलेक्ट्रीकल मागे, इरला, एस. व्ही. रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई ४०० ०५६ येथे या प्रसिद्धीच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, वरील सदर मिळकतीच्या संदर्भामध्ये दावे जर असल्यास, ते त्यागित समजले जातील.

दिनांक ३० सप्टेंबर, २०२२

वकील मितेश शाह
वकील उच्च न्यायालय

The spirit of Mumbai
is now 93 years old!

www.freepressjournal.in

शेअर प्रमाणपत्र गहाळ झाल्याचे सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, श्री. हरिष एल. फेरवानी यांचे नावे असलेले, फोलिओ क्र. ६, शेअर प्रमाणपत्र क्र. २२, शेअर्स ची संख्या : ५, विभिन्न क्रमांक १०६ पासून ११० समाविष्टित आणि शेअर प्रमाणपत्र क्र. ७०, फोलिओ क्र. ६, शेअर्सची संख्या : ४०, विभिन्न क्रमांक १०११ पासून १०५० पर्यंत समाविष्टित प्रत्येकी रु. ५०/– (रूपये पन्नास मात्र) चे पूर्ण भरणा झालेली शेअर्स, असोसिएटेड को–ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. (बॉम्बे को–ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्ट क्र. VII सन १९२५ च्या कलम १० अंतर्गत नोंदणीकृत) हरविले आहे, आणि मी, श्री. हरिष एल. फेरवानी प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करण्यासाठी सोसायटीकडे अर्ज करण्याचे प्रक्रियेत आहे. सर्व सामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येते की, वरील नमूद शेअर प्रमाणपत्राशी कोणत्याही व्यवहार करु नये.

मुंबई, दिनांकित सदर २९ सप्टेंबर, २०२२

CAPITALINDIA
Home Loans
CIN: U65990DL2017PLC322041

नोंदणीकृत कार्यालय: २ रा मजला, डीएलएफ सेंटर, संसद मार्ग, नवी दिल्ली ११०००१
दूर: +९१ ११ ४९५४ ६०००,
ईमेल: cihl@capitalindia.com

जोडपत्र – IV (नियम ८(१) पहा)
कब्जा सूचना (स्थावर मिळकती करीता)

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार हे कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड (सीआयएन क्र. **यु६५९९०डीएल२०१७पीएलसी३२२०४१**) चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (ॲक्ट) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचता कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून कर्ज खाते धारक क्रमांक एचएलएनएलआरडीएमएमआर००००७९ च्या संदर्भात दिनांक ०१.०७.२०२२ रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार **सौ. अंकिता नरेंद्र मोहन सिंग** यांना मागणी सूचनेत नमूद एकूण रक्कम **रु. १,२४,७७,९४८/– (रुपये एक करोड चोवीस लाख सत्त्याहत्तर हजार नऊशे अठ्ठेचाळीस) २०.०६.२०२२ रोजीस सह पुढील व्याज आणि २१.०६.२०२२ रोजीपासून त्यावरील उपार्जित/ उपार्जित होणारे कर्ज कराराच्या अटींमध्ये नमूद प्रभार** ही रक्कम सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून **६० दिवसांत** चुकती करण्यासाठी बोलाविण्याकरिता आले होते.

कर्जदार यांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ सहवाचता सदर ॲक्टचा कलम १३ चे उप–कलम (४) अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारांचा वापर करून येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा ह्या २८.०९.२०२२ रोजी घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मिळकतींसह देवघेवीचा व्यवहार करू नये आणि मिळकतीसह केलेला देवघेवीचा कोणताही व्यवहार हा **कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेडच्या** रक्कम **रु. १,२४,७७,९४८/– (रुपये एक करोड चोवीस लाख सत्त्याहत्तर हजार नऊशे अठ्ठेचाळीस) २०.०६.२०२२ रोजीस सह वरील नमूद नुसार पुढील व्याज** आणि **प्रभारा**च्या प्रभाराच्या अधीन राहील.

तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत ॲक्टचे कलम १३ चे उप–कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेतले जाते.

स्थावर मिळकतीचे वर्णन

सीटीएस क्र. डी/११०१–बी२८/१, सर्व्हे क्र. ४२३, कार्टर रोड, खार पश्चिम, मुंबई४०० ०५२ मध्ये समाविष्ट युनियन पार्क नावे ज्ञात इमारत मध्ये तळमजला येथे स्थित मिळकत शॉप क्र. १, मोजमापित १६० चौ.फू. बिल्ट अप (अंदाजे) आणि शॉप क्र. २बी, मोजमापित ७३ चौ.फू. बिल्ट अप (अंदाजे)मधील सह सर्व अधिकार (समाविष्ट समाविष्ट परंतु मर्यादीत नसलेले कॉमन क्षेत्र वापराचे अधिकार, सुविधा, सोयी, विकासाधिकार इ. आणि सर्व फर्निचर, फिक्चर, फिटिंग्ज आणि त्याच्याशी जोडलेले गोष्टी मधील सर्व अधिकार, नामाधिकार आणि हितसंबंध. पूर्व: नामाधिकार विलेखानुसार, पश्चिम: नामाधिकार विलेखानुसार, उत्तर: नामाधिकार विलेखानुसार, दक्षिण: नामाधिकार विलेखानुसार.

दिनांक : २८.०९.२०२२
ठिकाण: मुंबई

प्राधिकृत अधिकारी
कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड करीता

केनरा बैंक Canara Bank
सिंडिकेट Syndicate

एआरएम–I शाखा, मुंबई ३७, क्षमालया, पाटकर हॉल समोर, न्यू मरिन लाईन्स, ठाकर्सी मार्ग, मुंबई–४०००२०.
● दूर. क्र.: (०२२) २२०६ ५४२५/ ३०, ● ईमेल–cb2360@canarabank.com

विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदींन्वये स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकती या तारण धनकोंकडे गहाण आहेत, खालील नमूद मिळकतीचा **सांकेतिक कब्जा** कॅनरा बँकच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे त्या **मे. जाजू एन्टरप्रायझेस लि. प्रतिनिधीत्व द्वारे कर्जदार/ हमीदार श्री. कमल सत्यप्रकाश जाजू आणि सौ. निता कमल जाजू** यांचेकडून खालील नमूद अशा आमच्या बँ केला थकबाकी **रु. २४,३६,७९,६५७.००/– (३१.०७.२०१४ रोजीस अधिक ०१.०८.२०१४ पासूनचे पुढील व्याज आणि प्रभार)** च्या वसुलीकरिता **३१.१०.२०२२** रोजी **''जे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे''** आणि **''जे काही आहेत तेथे आहे''** तत्त्वाने विकण्यात येणार आहेत.

अनु क्र.	मिळकतीचा तपशील	राखीव किंमत (लाखात रू.)	इअर (लाखात रू.)
१.	मे. जाजू एन्टरप्रायझेस यांच्या नावे गाळा क्र. ३०५–३०६, ३ रा मजला, श्री बालाजी टॉवर, प्लॉट क्र. २१४, २१५ आणि २०१६, एम जी रोड, खजुरी बाझार, इंदोर, एम पी (मोजमापित ११३३.११ चौ.फू.)	रु. ५२,००,०००/–	रु. ५,२०,०००/–
२.	मे. जाजू एन्टरप्रायझेस यांच्या नावे गाळा क्र. ३०७–३०८, ३ रा मजला, श्री बालाजी टॉवर, प्लॉट क्र. २१४, २१५ आणि २०१६, एम जी रोड, खजुरी बाझार, इंदोर, एम पी (मोजमापित ८९४.७५ चौ.फू.)	रु. ३९,००,०००/–	रु. ३,९०,०००/–

इसारा अनामत रक्कम २९.१०.२०२२ रोजी किंवा पूर्वी सायं. ५.०० पर्यंत जमा करणे आवश्यक आहे.
सदर मिळकतीकरीता कोणताही भार बँकेला ज्ञात नाही.
राखीव किंमतीच्या १०% इअर रक्कम २९.१०.२०२२ रोजी किंवा पूर्वी सायं. ५.०० पर्यंत प्राधिकृत अधिकारी, कॅनरा बँक, एआरएम–I शाखा, मुंबई यांच्या नावे डिमांड ड्राफ्टच्या मार्गे जमा करावी. किंवा **कॅनरा बँक एआरएम १ शाखा, मुंबई खाते क्र. २०९२७२४३४ आयएफएससी कोड : सीएनआरबी०००२३६० च्या खात्यात** आरटीजीएस/एनईएफटी/फंड ट्रान्सफरमार्फत जमा करावी. इतर कागदपत्र सेवा पुरविठादारास **२९.१०.२०२२ रोजीस किंवा पूर्वी सायं. ५.०० पर्यंत सादर करावेत. बँकेकडे कागदपत्र जमा करण्याची तारीख २९.१०.२०२२**
सदर मिळकतीचे निरीक्षण २१.१०.२०२२ रोजी प्राधिकृत अधिकाऱ्यांसह आगाऊ नियुक्तीसह निरीक्षण करता येईल.
विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी कृपया कॅनरा बँकेची वेबसाईट **(www.canarabank.com)** मध्ये पुरविण्यात आलेल्या लिंक 'ई–ऑक्शन' ना संदर्भ घ्यावा किंवा डॉ. **सीमा सोमकुमार, मुख्य व्यवस्थापक, कॅनरा बँक, एआरएम–I ब्रांच, मुंबई (फोन (०२२) –२२०६५४२५/३०/ मो. क्र. ९८८१३ ६५०८७) किंवा रिनकीता सोदानी (मो. क्र. ९४१३६४१७०१) इमेल आयडी : cb2360@canarabank.com** येथे कोणत्याही कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. किंवा सेवा पुरवठादार मे. **सी १ इंडिया प्रा. लि., उद्योग विहार, फेझ–२, गल्फ पेट्रोकेम इमारत, इमारत क्र. ३०१, गुरगाव, हरियाणा, पिन: १२२०१५, श्री. हरेश गोवडा, मोबा. क्र. ९५९४५९७५५५ (संपर्क क्र. +९११२४४३०२०२०/ २१/२२/२३/२४, support@bankeauctions.com; hereesh.gowda@c1india.com** येथे संपर्क साधावा.

दिनांक : २८.०९.२०२२
ठिकाण : मुंबई

प्राधिकृत अधिकारी,
कॅनरा बँक, एआरएम १ शाखा

१) **मे. जाजू एन्टरप्रायझेस:** शॉप क्र. ३, इमारत क्र. ३/सी, जय हिंद इस्टेट. डॉ. आत्माराम मर्चंट रोड, भुलेश्वर, मुंबई ४०० ००२.
२) **श्री. कमल सत्यप्रकाश जाजू:** फ्लॅट क्र. ४, १ ला मजला, इमारत क्र.२–बी, जय हिंद इस्टेट, डॉ. आत्माराम मर्चंट रोड, भुलेश्वर, मुंबई ४०० ००२.
३) **सौः निता कमल जाजू:** फ्लॅट क्र. ४, १ ला मजला, इमारत क्र.२–बी, जय हिंद इस्टेट, डॉ. आत्माराम मर्चंट रोड, भुलेश्वर, मुंबई ४०० ००२.

Reliance RETAIL

रिलायन्स रिटेल लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, कोर्ट हाऊस, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२ • दूरध्वनी: +९१ २२ – ३५५५ ३८००
CIN: U01100MH1999PLC120563
ई–मेल: retail.secretarial@ril.com • www.relianceretail.com

Reliance Jewels

फॉर्म डीपीटी–१
परिपत्रक किंवा ठेवी मागविणाऱ्या जाहिरातीच्या स्वरूपातील परिपत्रक
(कंपन्या (ठेवी स्वीकारणे) नियम, २०१४ मधील कलम ७३(२)(अ) आणि कलम ७६ आणि नियम ४(१) आणि ४(२) अन्वये)

अनु. क्र.	तपशिल	माहिती
१.	**सर्वसाधारण माहिती**	
ए.	कंपनीचे नाव, पत्ता, वेबसाईट आणि संपर्काचा इतर तपशिल:	रिलायन्स रिटेल लिमिटेड, ३रा मजला, कोर्ट हाऊस, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२. •www.relianceretail.com •दूरध्वनी: +९१–२२–३५५५ ३८००
बी.	कंपनीच्या स्थापनेची तारीख:	२९–०६–१९९९
सी.	कंपनी आणि तिच्या उपकंपन्या करत असलेले व्यवसाय शाखा किंवा युनिटस्, काही असल्यास, त्याच्या तपशिलासह:	रिलायन्स रिटेल लिमिटेड कन्व्हिनियन्स स्टोअर्स, सुपरमार्केटस, स्पेशालिटी स्टोअर्स, डिजिटल आणि नवीन कॉमर्स प्लॅटफॉर्मस याद्वारे संपूर्ण देशातील आपल्या ग्राहकांच्या किराणा, कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स, फॅशन व लाईफस्टाईल आणि फार्मा, ह्या क्षेत्रातील त्यांच्या गरजा पूर्ण करून त्यांना सेवा प्रदान करते. कंपनीची ३० जून, २०२२ रोजी भारतातील सर्व प्रमुख शहरे आणि गावांमध्ये १५,१२० रिटेल स्टोअर्स आहेत. कंपनीच्या उपकंपन्या: काही नाही.
डी.	कंपनीच्या व्यवस्थापनाचा संक्षिप्त तपशिल:	कंपनीचे व्यवस्थापन पूर्ण वेळ संचालक आणि संचालक मंडळाची देखरेखीखाली व्यावसायिक व्यवस्थापकांची तुकडी, नियंत्रण आणि संचालनाखाली व्यवस्थापनाचे काम करते.

ई. संचालकांची नावे, पत्ते, डीआयएन आणि व्यवसाय:

नाव	पत्ता	डीआयएन	व्यवसाय
श्री. व्ही. सुब्रमण्यम् (पूर्णवेळ संचालक)	आभारन, प्लॉट क्र. ९५, सेक्टर क्र. २१, सेंट्रल पार्कजवळ, खारघर, रायगड – ४१०२१०	०००० ९६२१	कंपनी एक्झिक्युटिव
श्री. पंकज पवार	३०२, अर्चना सौरभ, प्लॉट क्र. २०, सेक्टर ७, कोपरखैरणे, नवी मुंबई – ४००७०९	०००८५०७७	नोकरी
श्री. संजय जोग	बी–७०२, ऋषी टॉवर, लोखंडवाला संकुल, स्वामी समर्थ नगर, आझाद नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०००५३	०१७२७६०२	नोकरी
श्री. रंजित व्ही. पंडित	दरभंगा मॅन्शन, फ्लॅट क्र. १, १२ कारमायकल रोड, बीएमसी कमिश्नर बंगल्याच्या समोर, पेडर रोड, मुंबई – ४०००२६	००७८२२९६	मॅनेजमेन्ट कन्सल्टन्ट
श्री. के. सुदर्शन	११०२, सबारी अॅशव्हीले, प्लॉट नं. पी–१, सीटीएस नं. ४५२ए, एन.एम. पाटील मार्ग, घाटला व्हिलेज, चेंबूर, मुंबई – ४०००७१.	०१०२९८२६	मॅनेजमेन्ट कन्सल्टन्ट
प्रो. दिपक सी. जैन	५५, ओव्हरलुक ड्राईव्ह, गोल्फ, इलिनॉइस – ६०० २९, युनायटेड स्टेट ऑफ अमेरीका	००२२८५१३	प्रोफेसर
श्रीमती गीता फुलवादया	ई ५१, झरोखा– २, कल्पतरू वाटिका, आकुर्ली रोड, ई. एस. आय. एस. हॉस्पिटलसमोर, कांदिवली (पूर्व), मुंबई – ४०० १०१	०३३४१९२६	नोकरी

एफ. जोखमींच्या घटकांविषयी व्यवस्थापनाचा दृष्टीकोन:
रिलायन्स रिटेल लिमिटेड ही रिलायन्स रिटेल व्हेन्चर्स लिमिटेड आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांची उपकंपनी आहे. रिलायन्स रिटेल लिमिटेड संघटित रिटेल व्यवसाय करते आणि कंव्हिनियन्स स्टोअर्स, सुपरमार्केटस, स्पेशलिटी स्टोअर्स, डिजिटल आणि न्यु कॉमर्स प्लॅटफॉर्म यांच्या माध्यमातून भारतातील ग्राहकांना त्यांच्या किराणा, कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स, फॅशन व लाईफस्टाईल आणि फार्मा यासंबंधी गरजांसाठी सेवा देते.
ठेव योजनांतर्गत जमा करण्यात आलेला निधी हा मुख्यत्वे त्यांच्या ग्राहकांनी दागिने खरेदीसाठी दिलेली अग्रीम रक्कम आहे आणि किंमत, बाजारपेठेतील जोखीम, स्पर्धा, नियामक वातावरणातील बदल आणि सर्वसाधारणपणे व्यवसायाशी संबंदित इतर सामान्य व्यवसायातील जोखमी ह्याव्यतिरिक्त त्याला इतर कोणत्याही आर्थिक जोखमी नाहीत.

जी. परतफेडीच्या बाबतीतील केलेल्या हलगर्जीपणाचा – रक्कम, हलगर्जीपणाचा कालावधी आणि सध्याची स्थिती, ह्यासंबंधी तपशिल:
- i) वैधानिक देणी: काही नाही
- ii) कर्जरोखे आणि त्यावरील व्याज: काही नाही
- iii) कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्थेकडून घेतलेले कर्ज आणि त्यावरील व्याज: काही नाही

२. ठेव योजनेचा तपशिल

ए)	संचालक मंडळाने ठराव मंजूर केल्याची तारीख	२१ जुलै, २०२२
बी)	सदर ठेवी मागविण्याचे अधिकार देणारा ठराव सर्वसाधारण सभेत मंजूर केल्याची तारीख	२० मे, २०१५
सी)	ठेवींचा प्रकार म्हणजे सुरक्षित किंवा असुरक्षित	असुरक्षित
डी)	ठेव रकमेचा तपशिल:	
	i) कायद्यानुसार आणि त्या अंतर्गत नियमांनुसार ठेवींद्वारा कंपनी किती रक्कम उभी करू शकते	रू. ६२३६.५५ कोटी
	ii) लगेचच्या मागील आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी प्रत्यक्षात धारण केलेल्या एकुण ठेवी	रू. २१५.०३ कोटी
	iii) परिपत्रक किंवा जाहिरात जारी केल्याच्या शेवटच्या तारखेला प्रत्यक्षात धारण केलेल्या एकुण ठेवी (२० जुलै, २०२२)	रू. २५६.५७ कोटी
	iv) प्रस्तावित उभी करण्याची ठेवींची रक्कम	रू. ५०० कोटीपर्यंत
	v) पुढील १२ महिन्यामध्ये परतफेड करण्याच्या ठेवींची रक्कम	रू. ९७.६३ कोटी

ई) ठेवी मागविण्याच्या अटी

तपशिल	योजना
योजनेचा कालावधी	६ महिन्यांची दागिने खरेदी योजना: ग्राहकाला ६ हप्ते भरावे लागतील आणि योजनेअंतर्गत एका महिन्याच्या हप्त्याच्या २०% पर्यंत सूटच्या स्वरूपात फायदा मिळेल. ११ महिन्यांची दागिने खरेदी योजना: ग्राहकाला ११ हप्ते भरावे लागतील आणि योजनेअंतर्गत एका महिन्याच्या हप्त्याच्या ८५% पर्यंत सूटच्या स्वरूपात फायदा मिळेल. १८ महिन्यांची दागिने खरेदी योजना: ग्राहकाला १८ हप्ते भरावे लागतील आणि योजनेअंतर्गत एका महिन्याच्या हप्त्याच्या २१०% पर्यंत सूटच्या स्वरूपात फायदा मिळेल. २४ महिन्यांची दागिने खरेदी योजना: ग्राहकाला २४ हप्ते भरावे लागतील आणि योजनेअंतर्गत एका महिन्याच्या हप्त्याच्या ३५०% पर्यंत सूटच्या स्वरूपात फायदा मिळेल.
सर्वसामान्य अटी	ह्या योजनेत सहभागी होण्यासाठी ग्राहकाला एक छापील प्रपत्र भरावे लागेल आणि त्यात नमूद केलेले दस्तऐवज सादर करावे लागतील. प्रत्येक योजने अंतर्गत, ग्राहकांना कमीत कमी रू.१,०००/– किंवा अधिक (रू. ५०० च्या पटीत) रकमेचे अनुक्रमे ६, ११, १८ आणि २४ स्थिर मासिक हप्ते भरावे लागतील. पहिला हप्ता एकतर रोख किंवा डेबिट कार्डने किंवा रिलायन्स ज्वेल्स शोरूमच्या नावे धनादेशाने भरावा लागेल. पुढील हप्ते रोख/क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड/पुढच्या तारखेचे धनादेश/ईसीएस द्वारे भरावेत. धनादेशांच्या बाबतीत फक्त स्थानिक धनादेश किंवा समान रकमेचे धनादेश स्वीकारले जातील आणि ते 'रिलायन्स रिटेल लिमिटेड' यांच्या नावे काढावेत. अनेक योजनांच्या खात्यासाठी एकच पैसे भरणारे इन्स्ट्रुमेन्ट स्वीकारले जाणार नाही. ग्राहकाने पहिला हप्ता भरण्याची तारीख ही योजना/खाते उघडण्याची तारीख समजण्यात येईल. ६ महिन्यांच्या योजनेसाठी योजना बंद होण्याची तारीख ही योजना सुरू होण्याच्या तारखेपासून ६ महिन्यांची अखेरची तारीख असेल. ११ महिन्यांच्या योजनेसाठी योजना बंद होण्याची तारीख ही योजना सुरू होण्याच्या तारखेपासून १३ महिन्यांची अखेरची तारीख असेल. १८ महिन्यांच्या योजनेसाठी योजना बंद होण्याची तारीख ही योजना सुरू होण्याच्या तारखेपासून २० महिन्यांची अखेरची तारीख असेल. २४ महिन्यांच्या योजनेसाठी योजना बंद होण्याची तारीख ही योजना सुरू होण्याच्या तारखेपासून २६ महिन्यांची अखेरची तारीख असेल. ग्राहकाला देय तारखेच्या आत मासिक हप्ता भरावा लागेल. ग्राहकाने धनादेशाने किंवा ईसीएसने पैसे भरल्यास, पैसे भरण्याचे इन्स्ट्रुमेन्ट हे मुदतीच्या तारखेच्या आत वसूल झाले पाहिजे. पुरेसे पैसे नसल्यामुळे वगैरे कारणांमुळे जर ओळीने २ वेळा इन्स्ट्रुमेन्ट परत गेल्यास कंपनी उर्वरित इन्स्ट्रुमेन्टस जमा करणार नाही. कोणत्याही योजने अंतर्गत ग्राहक सणांचा मौसम किंवा इतर घटनांनुसार कोणतीही सुरू असलेली सामायिक योजना /उत्पादन प्रचार /भेट वगैरेचा त्या योजने अंतर्गत मिळणाऱ्या सवलतीसह लाभ घेण्यास पात्र असेल. ग्राहकाचा मृत्यू झाल्यास अशा प्रसंगी त्याची ठेव रक्कम कोणाला मिळावी यासाठी ग्राहक कोणत्याही व्यक्तीचा नामनिर्देश करू शकतो. ग्राहकाला पैशाच्या पावतीत काही तफावत आढळल्यास त्याने सदर पावती जारी केल्याच्या तारखेपासून ७ दिवसांच्या आत कंपनीच्या सदर तफावत निदर्शनास आणून द्यावी.
व्याजदर	ही दागिने खरेदी योजना असल्यामुळे, ग्राहकाने दागिने खरेदी करण्याच्या वेळी खालील प्रमाणे सवलतीच्या स्वरूपात परतावा देऊ करण्यात येत आहे: **(योजना पूर्ण झाल्यानंतर, एका मासिक हप्त्याच्या % सूट मिळेल)** ६ महिन्यांची योजना: ए) ६ महिन्यांनंतर – २०% ११ महिन्यांची योजना: ए) ११ महिन्यांनंतर – ६५%; बी) १२ महिन्यांनंतर – ७५%; सी) १३ महिन्यांनंतर – ८५% १८ महिन्यांची योजना: ए) १८ महिन्यांनंतर – १७५%; बी) १९ महिन्यांनंतर – १९०%; सी) २० महिन्यांनंतर – २१०% २४ महिन्यांची योजना: ए) २४ महिन्यांनंतर – ३००%; बी) २५ महिन्यांनंतर – ३३०%; सी) २६ महिन्यांनंतर – ३५०% योजना पूर्ण होण्यापुर्वी ग्राहकाला दागिने खरेदी करायचे असल्यास (परंतु पहिला हप्ता भरल्यानंतर ६ महिन्यांच्या आत नाही), ग्राहकाला तरी सुद्धा फायदे मिळतील परंतु लागू नियमांनुसार पात्र सवलत कमी होईल. मासिक हप्ते भरण्यास उशीर केल्यास त्या प्रमाणात फायदे कमी होतील.
पैसे भरण्याची पद्धती	रोख/क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड/धनादेश/डीडी/ईसीएस मासिक अग्रीमच्या स्वरूपात. रू. २ लाख आणि अधिक रकमेची ठेव धनादेश, बँकर्स चेक किंवा कंपनीच्या निश्चित करण्यात आलेल्या खात्यात इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर द्वारा स्वीकारण्यात येईल.
रिडंप्शन/परतफेड	ही एक दागिने खरेदी योजना असल्यामुळे रिडंप्शन हे दागिन्याच्या खरेदीद्वारे असेल आणि रोख रक्कम सर्वसाधारणपणे परत केले जाणार नाहीत आणि कोणतीही घटना पहिल्या हप्त्याच्या ६ महिन्यांच्या अगोदर होणार नाही. ग्राहकाला कोणत्याही रिलायन्स ज्वेल्स शोरूममधून त्याने भरलेल्या हप्त्यांची रक्कम अधिक योजने अंतर्गत दिली जाणारी सवलत (खरेदी पात्रतेची रक्कम) इतक्या रकमेचे दागिने किंवा नाणे खरेदी करण्याची परवानगी आहे. उत्पादनाच्या अंतिम इन्व्हॉईसचे मूल्य हे खरेदी पात्रता रकमेइतके किंवा त्यापेक्षा अधिक असले पाहिजे. योजनेचे अंशात्मक रिडंप्शन करण्याची परवानगी नाही. फक्त ग्राहक किंवा त्यांची अधिकृत नामनिर्देशित व्यक्ती (अर्जानुसार) हे ह्या योजनेअंतर्गत दागिने खरेदी करण्यास पात्र आहेत. रिडंप्शनसाठी ग्राहकाला शोरूममध्ये स्वाक्षरी केलेल्या छायाचित्रासह ओळखीच्या पुराव्यासह हप्ता भरल्याची मूळ पावती सादर करावी लागेल.

एफ)	योजना सुरू झाल्याची तारीख आणि परिपत्रक किंवा जाहिरातीच्या वैधतेचा कालावधी नमूद करणारे प्रस्तावित वेळपत्रक	मुदत ठेव योजना (दागिने खरेदी योजना) २६ जून, २०१५ पासून सुरू आहे आणि हे जारी करण्यात आलेले परिपत्रक/जाहिरात ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत किंवा २०२३ मध्ये कंपनीच्या होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत, ह्यापैकी जे लवकर असेल तोपर्यंत, वैध असेल.
जी)	ठेव उभी करण्याची कारणे किंवा उद्दिष्टे:	रिलायन्स रिटेल लिमिटेड द्वारा आपल्या ज्वेलरी रिटेल व्यवसायासाठी ग्राहक मिळविण्याच्या कार्यक्रमाचा भाग म्हणून दागिने खरेदी योजना राबविण्यात येत आहे आणि त्याचबरोबर त्यामुळे ग्राहकांना सण, खास समारंभ किंवा इतर कारणांसाठी सुलभ आणि सोयिस्कर मासिक हप्त्यात दागिने खरेदी करण्याचे नियोजन व खरेदी करता येते. परंतु, कंपनी कायदा, २०१३ आणि कंपन्या (ठेवी स्विकारणे) नियम, २०१४ नुसार या योजनांअंतर्गत जमा करण्यात येणारी अग्रीम रक्कम ठेव समजली जाते.
एच)	मिळालेले क्रेडिट रेटिंग:	
	i) क्रेडिट रेटिंग एजन्सीचे नाव	केअर रेटिंग्स लिमिटेड (केअर)
	ii) मिळालेले रेटिंग	केअर एएए (ट्रिपल ए)
	iii) मिळालेल्या रेटिंगचा अर्थ	आर्थिक देणी वेळेत परत करण्याच्या बाबतीत सर्वाधिक प्रमाणात सुरक्षितता आणि त्यात सर्वात कमी क्रेडिट जोखीम असते. केअर एएए हे केअर द्वारा दिले जाणारे सर्वोच्च क्रेडिट रेटिंग आहे.
	iv) रेटिंग मिळाल्याची तारीख	३१ ऑगस्ट, २०२१ आणि ०३ मार्च, २०२२ ह्या गुणांकनाची वैधता संपण्यापुर्वी नवीन गुणांकन मिळविण्यात येईल.
आय)	सदर ठेवी सुरक्षित करण्यासाठी तयार केलेले किंवा करण्याचे चार्ज, काही असल्यास	असुरक्षित आणि म्हणून लागू नाही.
जे)	संचालक, प्रवर्तक किंवा महत्त्वाच्या व्यवस्थापकीय व्यक्तींचे सदर ठेवींमध्ये असलेले कोणतेही आर्थिक किंवा इतर ऐहिक स्वारस्य आणि इतर व्यक्तींना असलेल्या स्वारस्याच्या पेक्षा सदर स्वारस्याचा परिणाम	काही नाही

३. कोणत्याही थकित ठेवींचा तपशिल:

ए.	थकित रक्कम (*म्हणजे ग्राहकांकडून दागिने खरेदी योजनेअंतर्गत जमा करण्यात आलेली अग्रिम रक्कम जी ठेव समजली जाते.)	रू. २१५.०३ कोटी*
बी.	स्वीकारल्याची तारीख	वेगवेगळ्या तारखा
सी.	एकुण स्वीकारलेली रक्कम	रू. १८४.१८ कोटी (आर्थिक वर्ष २०२१–२२ मध्ये वेगवेगळ्या परिपक्वता तारखांना)
डी.	व्याजाचा दर	ही दागिने खरेदी योजना असल्यामुळे व्याजाच्या स्वरूपात परतावा देऊ केला जात नाही. परंतु योजनेतील नियम व अटींनुसार दागिन्यांच्या खरेदीवर सूट दिली जाते.
ई.	एकुण ठेवीदारांची संख्या (२० जुलै, २०२२ रोजी असलेली थकबाकी)	१,३३,१७२
एफ.	ठेवींच्या परतफेडीच्या बाबतीत आणि त्यावरील व्याजाच्या बाबतीत काही हलगर्जीपणा झाला आहे का, ठेवीदारांची संख्या, रक्कम आणि केलेल्या हलगर्जीपणाच्या कालावधीसह.	काही नाही
जी.	ठेवीदारांनी सोडून दिलेले ठेवींवरील व्याज	काही नाही

४. कंपनीची आर्थिक स्थिती

ए. परिपत्रक किंवा जाहिरात जारी केल्याच्या तारखेच्या लगेच अगोदरच्या तीन आर्थिक वर्षांसाठी करासाठी तरतूद करण्यापुर्वी आणि नंतर कंपनीचा नफा

रु. कोटीमध्ये

आर्थिक वर्ष	करपूर्व नफा	करपश्चात नफा
२०२१–२२	६,५७९.९२	४,९३४.६५
२०२०–२१	६,१८१.५६	४,५८६.८६
२०१९–२०	७,४२३.४२	५,५३९.७९

बी.	कंपनीने सदर तीन वर्षांसाठी घोषित केलेला लाभांश	काही नाही

मागील तीन वर्षाचे व्याज संरक्षण गुणोत्तर (रोख करपश्चात नफा अधिक दिलेले व्याज)

आर्थिक वर्ष	व्याज संरक्षण गुणोत्तर
२०२१–२२	४.४०
२०२०–२१	९.७२
२०१९–२०	९.६९

सी. परिपत्रक किंवा जाहिरात जारी केल्याच्या तारखेच्या लगेच अगोदरच्या तीन आर्थिक वर्षांच्या कंपनीच्या आर्थिक स्थितीचा गोषवारा (आवश्यक असेल तेथे मागील वर्षांची आकडेवारी पुनर्गठित करण्यात आली आहे).

(रु. कोटीमध्ये)

तपशिल	३१–०३–२०२२ रोजी	३१–०३–२०२१ रोजी	३१–०३–२०२० रोजी
मालमत्ता			
चालू नसलेली मत्ता			
मालमत्ता, कारखाना व उपकरणे	१४,०१९.११	८,२६३.९५	७,९८५.३४
भांडवल चालू कामे	११,८८२.११	६,९९१.५५	६,०६८.३४
व्यवसायातील पत	२.९०	२.९०	–
अमूर्त मत्ता	२,७७५.१८	३,१६४.७०	९८१.८०
विकासाधीन अमूर्त मत्ता	११,८३९.६६	३,६१२.१३	२,७५२.७४
वित्तीय मत्ता			
गुंतवणुका	७१६.३९	५८६.२४	५७८.२४
कर्ज	–	–	२,४३६.१०
इतर चालू नसलेली मत्ता	६,५३२.५४	५८.७२	२२२.९१
एकुण चालू नसलेली मत्ता	**४७,७६७.८९**	**२२,६७९.३९**	**२०,२२५.४७**
चालू मत्ता			
इन्व्हेन्टरीज	२०,०३६.०८	१२,३२१.६०	९,३४८.१६
वित्तीय मत्ता			
व्यापारातील येणी	८,८०४.६६	६,०९१.४७	२,४८९.१०
रोख व रोखसमान	४६०.२२	३५२.९६	३३४.५०
इतर वित्तीय मत्ता	२,६९२.७७	२,५८६.२८	१,५०८.६७
इतर चालू मत्ता	८,३६३.०३	६,२२०.५९	१,६६०.०१
एकुण चालू मत्ता	**४०,३५६.७६**	**२७,५००.९०**	**१५,३४०.४४**
एकुण मत्ता	**८८,१२४.६५**	**५०,१८०.२९**	**३५,५६५.९१**
इक्विटी आणि दायित्व			
इक्विटी			
इक्विटी भाग भांडवल	४,९९०.४२	४,९९०.४२	४,९९०.४०
इतर इक्विटी	२५,२६४.३४	२०,३३१.७९	१३,१२४.७८
एकुण इक्विटी	**३०,२५४.७६**	**२५,३२२.२१**	**१८,११५.१८**
दायित्व			
चालू नसलेले दायित्व			
वित्तीय दायित्व			
उसनवारी	१२,०२१.००	–	–
तरतूद	६८.३८	४८.२०	३८.१०
प्रलंबित कराचे दायित्व (निव्वळ)	१,४४८.८८	९१७.७५	९०८.२०
एकुण चालू नसलेले दायित्व	**१३,५३८.२६**	**९६५.९५**	**९४६.३०**
चालू दायित्व			
वित्तीय दायित्व			
उसनवारी	२८,७३५.४४	१४,७४५.८८	४,६६५.७४
व्यापारातील देणी यामुळे:			
सूक्ष्म व लहान व्यवसाय	६३३.०३	४०१.३९	३३.९७
सूक्ष्म व लहान व्यवसायाव्यतिरिक्त	१२,२८९.४०	६,२८१.५१	५,६४२.८७
इतर वित्तीय दायित्व	१,२२८.५९	१,३७७.२१	५,१०९.४३
इतर चालू दायित्व	१,४४०.३३	१,०८२.५६	१,०४९.३३
तरतुदी	४.८४	३.५८	३.०९
एकुण चालू दायित्व	**४४,३३१.६३**	**२३,८९२.१३**	**१६,५०४.४३**
एकुण दायित्व	**५७,८६९.८९**	**२४,८५८.०८**	**१७,४५०.७३**
एकुण इक्विटी आणि दायित्व	**८८,१२४.६५**	**५०,१८०.२९**	**३५,५६५.९१**

डी. परिपत्रक किंवा जाहिरात जारी केल्याच्या तारखेच्या लगेच अगोदरच्या तीन आर्थिक वर्षांचे लेखापरीक्षित रोखतेच्या प्रवाहाचे विवरण: (आवश्यक असेल तेथे मागील वर्षांची आकडेवारी पुनर्गठित करण्यात आली आहे).

(रु. कोटीमध्ये)

तपशिल	२०२१–२२	२०२०–२१	२०१९–२०
ए. प्रचलनाच्या कामकाजाद्वारे रोखतेचा प्रवाह			
नफा व तोटा लेखानुसार करपूर्व नफा/तोटा	६,५७९.९२	६,१८१.५६	७,४२३.४२
यासाठी समायोजित:			
(नफा)/विक्रीतील तोटा/मालमत्तेची विल्हेवाट, कारखाना व यंत्रसामग्री (निव्वळ)	८.२२	२.७८	४४.०४
व्यवसायाच्या विक्रीतील नुकसान	–	२३.९४	–
घसारा व अमॉरटायझेशनचा खर्च	१,७८१.०३	१,४४७.५८	१,१०८.८५
विनिमय दरातील बदलाचा परिणाम	२.९३	(११.००)	८.२०
आर्थिक मत्तांवर निव्वळ लाभ	–	(१४.६५)	(६६.५३)
व्याजावरील मिळकत	(१२.४६)	(२२४.४२)	(१९३.८२)
वित्तीय खर्च	१,९७७.२४	६९३.०३	८६७.०३
खेळत्या भांडवलातील बदलापुर्वी नफा	**१०,३३६.८८**	**८,०९८.८२**	**९,१९१.१९**
यासाठी समायोजित:			
व्यापारातील व इतर येणी	(६,२३७.९०)	(५,०७०.६१)	७८५.७३
इन्व्हेन्टरीज	(७,७१४.४८)	(२,९७३.४४)	१,९४३.६७
व्यापारातील व इतर देणी	६,४२३.२२	१,९६१.५३	५,६४०.६८
एकुण	**(७५२९.१६)**	**(६०८२.५२)**	**८३७०.०८**
प्रचलनाद्वारे निर्माण होणारी रोखता	२,८०७.७२	२,०१६.३०	१७,५६१.२७
कर भरले (निव्वळ)	(१,१५७.९६)	(१,४२४.१०)	(१,०८७.३५)
प्रचलनाच्या कामकाजाद्वारे निव्वळ रोख/(वापरलेली)	**१,६४९.७६**	**५९२.२०**	**१६,४७३.९२**
बी. गुंतवणूकीच्या कामकाजाद्वारे रोखतेचा प्रवाह			
मालमत्ता, कारखाना व यंत्रसामग्री आणि अमूर्त मालमत्तेची खरेदी	(२०,३३३.६३)	(८,२१६.६१)	(७,१८५.२४)
मालमत्ता, कारखाना व उपकरणे आणि अमूर्त मालमत्तेच्या विक्रीतून मिळालेले पैसे	७.४८	११.८७	४९२.१३
होल्डिंग कंपनीला व्यवसायाची विक्री	–	४२.४६	–
उपकंपन्या/संयुक्त उपक्रम यामधील गुंतवणूक	(६.००)	(८.००)	(२.५०)
वित्तीय मालमत्तांची खरेदी	(१२४.१५)	(१२,३२३.५०)	(५५,९३१.०१)
वित्तीय मालमत्तेच्या विक्रीतून मिळालेला पैसा	–	१२,३३८.१५	५९,०००.४३
इतर वित्तीय मत्तांमध्ये हालचाल	–	२,४३६.१०	(१,३१३.९६)
कर्ज व अग्रीम आणि इतर मत्तांमध्ये हालचाल	(५,२२३.४५)	(४,२३७.१९)	–
व्याजावरील मिळकत	१०.४२	२८५.०२	१७९.९०
गुंतवणुकीच्या कामकाजात वापरलेली निव्वळ रोख	**(२५,६६९.३३)**	**(९,६७१.७०)**	**(४,७६०.२५)**
सी. वित्तीय कामकाजाद्वारे रोख			
प्राधान्यप्राप्त समभागांच्या इश्यूमधून मिळालेला पैसा	–	२,६१८.७८	०.०२
इक्विटी समभागाच्या इश्यूचे पैसे	–	०.०२	०.८६
कर्जाची परतफेड – चालू नसलेल्या	१२,०२१.००	–	–
कर्ज – चालू (निव्वळ)	१३,९८९.५६	११,७८५.१४	(८,१३४.८२)
दिलेले व्याज	(१,८८३.७३)	(६०५.९८)	(८५४.८१)
ठेवींचे चलन	–	(४,७००.००)	(२,७२०.११)
वित्तीय कामकाजाद्वारे निव्वळ रोख/(वापरलेली)	**२४,१२६.८३**	**९,०९७.९६**	**(११,७०८.८६)**
रोख आणि रोख तत्सममधील निव्वळ वाढ/(घट)	**१०७.२६**	**१८.४६**	**४.८१**
रोख आणि रोख तत्समची सुरूवातीची शिल्लक	**३५२.९६**	**३३४.५०**	**३२९.६९**
रोख आणि रोख तत्समची अखेरची शिल्लक	**४६०.२२**	**३५२.९६**	**३३४.५०**

ई.	मागील तीन वर्षातील लेखा धोरणातील कोणतेही बदल आणि कंपनीच्या नफ्यावर व राखिव निधीवर त्यांचे परिणाम	कंपनीचे वित्तीय विवरण कंपनी कायदा, २०१३ मधील कलम १३३ सोबत वाचले असता कंपन्या (भारतीय लेखा परिमाणे) सुधारणा नियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित भारतीय लेखा परिमाण (''इंड एएस'') नुसार तयार करण्यात आले आहेत.

५. संचालक घोषित करत आहेत की –

कंपनीचे संचालक मंडळ याद्वारे घोषित करित आहे की:
- ए. कंपनीने कायदा लागू होण्यापुर्वी किंवा त्यानंतर ठेवींची किंवा त्यावरील व्याजाची परतफेड करण्याच्या बाबतीत कोणताही कसूर केलेला नाही;
- बी. कंपनीचे व्यवहार आणि भवितव्य याबाबतीत संचालक मंडळाचे संपूर्ण समाधान झाले आहे आणि त्याचे असे मत आहे की कंपनीच्या भविष्यातील आर्थिक स्थितीचा अंदाज घेतला असता, कंपनीला, जेव्हा जेव्हा दायित्व निर्माण होईल तेव्हा ते पूर्ण करता येईल आणि परिपत्रक किंवा जाहिरात जारी केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत कंपनीचे दिवाळे निघणार नाही;
- सी. कंपनीने कायद्यांची आणि त्या अंतर्गत नियमांची पूर्तता केली आहे;
- डी. कायद्यांची आणि त्या अंतर्गत नियमांची पूर्तता करणे याचा अर्थ केन्द्र सरकार ठेवींच्या परतफेडीची खात्री देत आहे असा होत नाही;
- ई. कायद्याची अंमलबजावणी होण्यापुर्वी कंपनीने स्वीकारलेल्या ठेवींची परतफेड करण्यात आली आहे;
- एफ. क्रेडिट रेटिंगमध्ये काही प्रतिकूल बदल झाल्यास, कोणताही दंड आकारला न जाता ठेवीदारांना ठेव रक्कम परत काढण्याची संधी देण्यात येईल;
- जी. परिपत्रक किंवा जाहिरातीच्या स्वरूपातील परिपत्रकात नमूद केलेल्या हेतूसाठीच फक्त ठेवींचा उपयोग करण्यात येईल;
- एच. कंपनीने स्वीकारलेल्या ठेवी (सुरक्षित ठेवींव्यतिरिक्त, इतर काही, ज्याची एकुण रक्कम नमूद करावी) ह्या असुरक्षित आहेत आणि त्यांची श्रेणी कंपनीच्या इतर असुरक्षित दायित्वांप्रमाणे *समान मानण्यात* येईल.

हे परिपत्रक कंपनीच्या संचालक मंडळाच्या अधिकारात आणि त्यांच्या नावाने जारी करण्यात येत आहे, ह्यातील मसुदा संचालक मंडळाने त्यांच्या दिनांक २१ जुलै, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत मंजूर केला आहे आणि कंपनीच्या बहुतांश संचालकांनी स्वाक्षरी केलेली त्याची प्रत कंपनी निबंधकांच्या कार्यालयात सादर करण्यात आली आहे.

व्ही. सुब्रमण्यम् **पंकज पवार** **संजय जोग**
रंजित व्ही. पंडित **के. सुदर्शन** **गीता फुलवादया** **प्रो. दिपक सी. जैन**

वैधानिक लेखापरिक्षक प्रमाणपत्र

प्रती,
संचालक मंडळ,
रिलायन्स रिटेल लिमिटेड
३रा मजला, कोर्ट हाऊस,
लोकमान्य टिळक मार्ग,
धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२

संदर्भ: कंपनीच्या (ठेवी स्वीकारण्याची) नियम २०१४, च्या नियम–४ नुसार दुरुस्ती केलेल्या प्रमाणपत्र डीपीटी–१ अर्जाशी संलग्न प्रमाणपत्र

१. रिलायन्स रिटेल लिमिटेड (''कंपनी''), ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, कोर्ट हाऊस, लोकमान्य तिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२, येथे आहे, यांचेबरोबर करण्यात आलेल्या आमच्या प्रतिबद्धतेच्या अटींनुसार हे प्रमाणपत्र जारी करण्यात येत आहे. कंपन्या (ठेवी स्वीकारणे) नियम, २०१४ मधील नियम ४, सुधारित (''नियम'') नुसार कंपनीने आम्हाला प्रमाणपत्र जारी करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार, सदर नियमांमधील तरतुदींच्या अन्वये सोबतचे प्रमाणपत्र तयार करण्यात आले आहे.

व्यवस्थापनाची जबाबदारी:

२. कंपनी अधिनियमन, २०१३ ("कायदा") शी संबंधित असलेल्या तरतुदींचे पालन करण्यासाठी व्यवस्थापन जबाबदार आहे आणि कंपनी द्वारे ठेवींची रक्कम परत देण्यात आणि अशा प्रकारच्या देयांवरील व्याजांची स्वीकृती देण्यात कायदा सुरू होण्यापुर्वी कोणताही हलगर्जीपणा करण्यात आलेला नाही. या जबाबदाऱ्यांमध्ये नियमाच्या नियम ४ चे पालन करण्यासाठी रचना, अंमलबजावणी आणि देखभालीचा देखील समावेश करण्यात आलेला आहे.

लेखापरिक्षकांची जबाबदारी:

३. नियमांच्या नियम ४ च्या आवश्यकतांनुसार, आमची जबाबदारी ही कंपनीने ठेवींची परतफेड किंवा अशा ठेवींवरील व्याजाची परतफेड ही कायद्या पुर्वी की त्यानंतर कोणत्याही हलगर्जीपणा विना करण्याची आहे. यापुढे आमची अशी देखील जबाबदारी आहे की कायदा लागू होण्यापुर्वी आणि नंतर असलेल्या ठेवींचा परतावा हा कोणत्याही हलगर्जीविना करावा किंवा अशा प्रकारच्या ठेवींवरील व्याजाची परत फेड करण्याकरिता पाच वर्षांचा कालावधी असेल किंवा त्याला अनुसरून तो असेल.

४. वरील आश्वासन हे कंपनीच्या आर्थिक वर्ष २०१६–१७ मधील तत्कालीन लेखापरीक्षकांनी जारी केलेल्या असुधारित लेखापरीक्षकांच्या अहवालाच्या आमच्या पडताळणीवर आधारित आहे, ज्यात असे नमूद करण्यात आले आहे की, कंपनीने ठेवी स्वीकारण्याच्या संदर्भात संबंधित कायदा आणि नियमांच्या संदर्भातील तरतुदींची, लागू असेल त्याप्रमाणे, पूर्तता केली आहे. अधिनियमाच्या लागू केलेल्या तरतुदी आणि संबंधित नियमांनुसार कंपनीने दिलेल्या अनुपालन प्रमाणपत्राचा संदर्भ देखील दिला जातो की या कायद्याच्या प्रारंभाच्या आधी किंवा नंतर त्यावरील व्याज देण्याआधी स्वीकारल्या जाणाऱ्या ठेवींच्या परतफेडीमध्ये कोणताही हलगर्जीपणा केलेला नाही.

५. ३१ मार्च, २०१८, ३१ मार्च, २०१९, ३१ मार्च, २०२०, ३१ मार्च, २०२१ आणि ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षांच्या संदर्भात आम्ही खात्याच्या आणि इतर संबंधित नोंदी आणि देखरेख केलेले दस्तावेज, व्यवस्थापन आणि कंपनीच्या लेखापरिक्षित वित्तीय अहवालाद्वारे पुरविल्या गेलेल्या माहितीची तपासणी केली आहे. ३१ मार्च, २०१८, ३१ मार्च, २०१९, ३१ मार्च, २०२०, ३१ मार्च, २०२१ आणि ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षाकरिता आम्ही २५ एप्रिल, २०१८, १६ एप्रिल, २०१९, २८ एप्रिल, २०२०, ३० एप्रिल, २०२१ आणि ५ मे, २०२२ रोजी आमच्या अहवालाद्वारे अनधिकृत मत जारी केले आहे. या वित्तीय विधानाचे आमचे लेखापरिक्षण कायद्याच्या कलम १४३(१०) अंतर्गत नमूद केलेल्या लेखापरिक्षणाच्या गुणवत्तेनुसार केले गेले आहे. वित्तीय निकषांमुळे भौतिक चुकीची संभावना नाही असे होत नाही आणि म्हणूनच आम्ही वाजवी नियोजन आणि खात्रीशीर आश्वासनाद्वारे लेखापरिक्षण करतो.

६. डीपीटी–१ मधील वैशिष्ट्यांची तपासणी आम्ही इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाऊंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) द्वारे जारी केल्या गेलेल्या अहवालांवर मार्गदर्शक सूचना किंवा विशेष हेतूसाठी असलेल्या (सुधारीत २०१६) ("मार्गदर्शक सूचना") प्रमाणपत्रांनुसार आणि कायद्याच्या विभाग १४३(१०) नुसार निर्दिष्ट असलेल्या लेखापरिक्षणाच्या मानकांनुसार केली आहे. आयसीएआयने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनेच्या नैतिक आवश्यकतांचे पालन करण्याबाबत देखील आम्ही कटीबद्ध आहोत.

७. आम्ही स्टॅन्डर्ड ऑन क्वॉलिटी कंट्रोल (एसक्यूसी) १, लेखापरिक्षण करणाऱ्या फर्म्सकरता असलेल्या गुणवत्ता नियंत्रण आणि ऐतिहासिक आर्थिक माहितीमधील मूल्यांकन आणि इतर संबंधित सेवा गुंतवणूकींची अंमलबजावणी लागू करणाऱ्या आवश्यकतांचे पालन केले आहे.

मत/अभिप्राय

८. वरती नमूद केलेल्या आमच्या परिक्षणानुसार आणि कंपनीच्या व्यवस्थापनाद्वारे आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार, स्पष्टीकरणांनुसार आणि सादरीकरणांनुसार, आम्ही असे प्रमाणित करतो की कंपनीने ठेवींची परतफेड किंवा अशा प्रकारच्या ठेवींवरती व्याज देताना कायदा सुरू होण्या आधी किंवा तो स्वीकारल्यानंतर कोणताही हलगर्जीपणा केलेला नाही.

वापरावरती प्रतिबंध

९. प्रमाणपत्राच्या नियम ४ मधील अर्ज डीपीटी–१ ला अनुसरून आमच्या प्रमाणपत्रांची पुर्तता करणे हेतू कंपनीच्या विनंतीनुसार प्रमाणपत्र जारी केले गेले आहे आणि कोणत्याही अन्य व्यक्तीद्वारे किंवा अन्य कोणत्याही हेतूने याचा वापर केला जाणार नाही आणि केला जाऊ नये. त्यानुसार, आम्ही इतर कोणत्याही हेतूसाठी किंवा कोणत्याही इतर व्यक्तीसाठी किंवा कोणत्याही व्यक्तीने हे प्रमाणपत्र दाखविल्यास त्याची जबाबदारी स्वीकारत नाही किंवा कोणीही त्याचा उपयोग हा आमच्या लेखी परवानगीशिवाय करू नये.

डीटीएस आणि असोसियेट्स एल.एल.पी.
चार्टर्ड अकाऊंटन्ट्सकरिता
फर्म नोंदणी क्र. 142412W/W100595

विशाल डी. शाह
पार्टनर
मेंबरशीप क्र.: ११९३०३
UDIN: 22119303ANVXYE6911

स्थळ : मुंबई
दिनांक : २१ जुलै, २०२२